महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे,

# म.ए.सो. कला व वाणिज्य रात्र महाविद्यालय,

कर्वे रोड, पुणे -४११००४

जागतिक ग्राहक संरक्षण दिनानिमित्त आयोजित विशेष व्याख्यान

## "ग्राहकांची हक्क आणि कर्तव्ये"

**दिनांक :-** दि. १५ मार्च २०२१

**वेळ :-** सायं. ६.३० वा.

**प्रमुख वक्ते:-** श्री.विलास लेले (**कोषाध्यक्ष,** अखिल भारतीय ग्राहक पंचायत, पुणे)

**कार्यक्रमाचे उद्देश :-**

१. विद्यार्थ्यांमध्ये ग्राहक म्हणून त्यांचे असलेले हक्क व कर्तव्य याबद्दल जागृती निर्माण करणे .
२. विद्यार्थ्यांना ग्राहक संरक्षण कायद्याबद्दल माहिती देणे.

**कार्यक्रमाचे स्वरूप व कार्यवाही**:

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या कला व वाणिज्य रात्र महाविद्यालयाने जागतिक ग्राहक संरक्षण दिनानिमित्त आयोजित केलेल्या विशेष व्याख्यानाच्या कार्यक्रमाची सुरुवात दि. १५ मार्च २०२१ रोजी सायं ठीक ६.३० वा. सरस्वती मंत्राच्या सुमधुर गायनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन ऑनलाईन (Google Meet) माध्यमातून करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्याक्रमासाठी विशेष उपस्थित असलेले महाविद्यालयाचे प्र-प्राचार्य डॉ. अतुल कुलकर्णी सरांनी केले. महाविद्यालयाचे प्रा. दादासाहेब मगर सरांनी या विशेष व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून लाभलेले श्री. विलास अनंत लेले यांचा थोडक्यात परिचय करून दिला आणि त्यानंतर वक्त्यांनी आपल्या मार्गदर्शनास सुरुवात केले.

प्रमुख वक्ते श्री.विलास अनंत लेले सरांनी आपल्या व्याख्यानामध्ये विद्यार्थी तसेच इतर सर्व श्रोत्यांसमोर १९७४ सालापासून पुण्यामध्ये सुरु झालेल्या ग्राहक चळवळीपासून तर ग्राहक पंचायत, ग्राहक मंच ते पुढे ग्राहक संरक्षण कायद्यापर्यंतचा प्रवास त्यांनी मांडला. ग्राहक पंचायतीच्या देशभर सुरु असलेल्या सक्रीय कार्याची त्यांनी थोडक्यात माहिती दिली. आपण सर्वच जण अगदी जन्मापासून

मृत्युपर्यंत ग्राहक म्हणून भूमिका पार पाडत असतो ती पार पडत असताना ग्राहकांचे काय अधिकार असतात आणि त्याबरोबरच खरेदी करत असताना आपण काय काळजी घेतली पाहिजे ग्राहकांची कर्तव्ये नेमकी काय असतात याबद्दल सरांनी अतिशय उपयुक्त असे मार्गदर्शन केले. व्याख्यानाच्या शेवटी सरांनी ग्राहकांच्या तक्रार निवारणाच्या प्रक्रियेबद्दल नेमकी माहिती देऊन त्यासाठी महत्वाची अशी संकेतस्थळे आणि संपर्क क्रमांक उपलब्ध करून दिले. कार्यक्रमास एकूण ५५ श्रोते उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन प्रा. अमरदीप गुरमे सरांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि संयोजन प्रा. रामदास बडे सरांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्र- प्राचार्य डॉ. अतुल कुलकर्णी सरांचे विशेष मार्गदर्शन आणि उपस्थिती लाभली. अशाप्रकारे हा ग्राहक संरक्षण दिनानिमित्त ग्राहकांच्या जनजागृतीच्या उद्देशाने आयोजित केलेला विशेष व्याख्यानाचा कार्यक्रम उस्फुर्तपणे पार पडला.

**कार्याक्रमाचे फलित :-**

१. दैनंदिन आयुष्यात अत्यंत महत्वाच्या असलेल्या ग्राहकांची हक्क आणि कर्तव्यांविषयी विद्यार्थी तसेच इतर सर्व श्रोत्यांना अतिशय उपयुक्त अशी माहिती मिळाली.

२. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये असलेल्या विविध शंकांचे वक्त्यांनी निरसन केले तसेच भविष्यातही या विषयाबद्दल सखोल मार्गदर्शन व वेळोवेळी आवश्यक ती मदत करण्याची ग्वाही दिली.




